अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २३/०९/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३०/२०२५ |
| कलम | कलम ७, ७(अ) भ.प्र.अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. अरुणकुमार समरबहादुर सिंग, वकील |
| पाहिजे आरोपी | श्री. रोहित रमेश सावंत, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा लोहमार्ग, दादर, मुंबई. |
| लाचेची मागणी | रू. ५,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती रु. ४,५०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना त्यांचे दाजी यांनी सांगितले की, बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे गु.र.क्र. ३५३/२०२५ कलम ६१,२०४,३१६,३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये दाखल गुन्हयात अटक न करण्याकरीता पोलीस निरीक्षक रोहित रमेश सावंत यांना रू. १०,००,०००/- दयावे लागतील असे त्यांच्यावतीने वकील अरूणकुमार सिंग यांनी सांगितले आहे. दिनांक १३/०९/२०२५ रोजी तक्रारदार यांनी वकील अरूणकुमार सिंग यांची भेट घेवून त्यांचे दाजी यांना नमूद गुन्हयात अटक न करण्याकरीता रू. ५,००,०००/- दिले असता, वकील अरूणकुमार सिंग यांनी तक्रारदार यांना पोलीस निरीक्षक रोहित सावंत यांच्याकडे घेवून गेले. लोकसेवक पोलीस निरीक्षक रोहित सावंत यांनी तक्रारदार यांना उर्वरीत रू. ५,००,०००/- देण्यास सांगून लाचेची मागणी केली. तदनंतर वकील अरूणकुमार सिंग व पोलीस निरीक्षक रोहित सावंत यांनी तक्रारदार यांना वारंवार व्हॉट्सअप कॉलद्वारे संपर्क करून उर्वरीत लाचेची रक्कम रू. ५,००,०००/- मागणी करू लागले. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १८/०९/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १९/०९/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक रोहित सावंत यांनी तक्रारदार यांना वकील अरूणकुमार सिंग यांचेशी बोलून घेण्यास सांगितले. नमूद वेळी झालेल्या चर्चेदरम्यान वकील अरूणकुमार सिंग यांनी तक्रारदार यांचेकडून यापुर्वी रू. ५,००,०००/- घेतल्याचे मान्य करून उर्वरीत लाचेची रक्कमचे मागणी करून तडजोडीअंती रू. ४,५०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २२/०९/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान वकील अरूणकुमार सिंग यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. ४,५०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर वकील अरूणकुमार सिंग यांनी लोकसेवक पोलीस निरीक्षक रोहित सावंत यांना कॉल करून लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सांगितले असता, त्यांनीदेखील त्यास संमती दर्शवली. म्हणुन १) अरूणकुमार समरबहादूर सिंग, वकील व २) रोहित रमेश सावंत, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा लोहमार्ग, दादर, मुंबई यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७, ७(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री संदीप पाटील, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. संतोष गुर्जर, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**

**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064** **मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**